नि.फौ.ख.कं.१७०/२०१७.
सरकार-वि-विलास उर्फ कैलाश
निशाणी क.१२

# सरकारतर्फे साक्षदार क.०२ ची जबानी

मी शपथेवर सांगतो की,

**माझे नांव :** कैलाश **माझे वडीलाचे नांव:** परशराम उईके
**वय** – ३५ वर्षे, **व्यवसाय –** काही नाही,
**राहणार :** कलंभा, **तह.** काटोल, **जिल्हा –** नागपूर.

-----------------------

**सरतपासणी–सरकारतर्फे श्री. व्ही.यु. मिरचे, सहाय्यक सरकारी वकील.**

मी आरोपीला ओळखतो. पोलीसांनी मला कुठेही पंच म्हणून बोलावले नव्हते. पोलीस माझ्या घरी आले होते व माझी सही घेतली होती. पोलीसांनी माझ्या समक्ष काहीही जप्त केले नव्हते. तसेच घटनास्थळ पंचनामा माझ्या समक्ष तयार केला नव्हता. आता मला दाखविण्यात आलेल्या घटनास्थळ व दोन जप्ती पंचनामे दाखविण्यात आले. त्यांवर माझ्या सहया आहेत. त्यातील मजकुर माझ्या माहिती प्रमाणे लिहिलेला नाही. माझ्या सहयांना अनुक्रमे **नि.क.१३, १४ आणि १५** देण्यात आले.

**साक्षीदार हा सरकार पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे सरकारी वकील साहेबानी साक्षीदाराला उलट तपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली ती त्याना देण्यात आली.**

हे म्हणने खरे नाही की, दि.११.१०.२०१७ रोजी पोलीसांनी मला सतीमाता मंदीराकडे जाणा–या रोडवर कलंभा येथे बोलावले होते. हे म्हणने खरे नाही की, त्या ठिकाणी पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळाची पाहणी केली होती व त्याबाबतचा घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. हे म्हणने खरे नााही की, तो पंचनामा वाचूनच मी सही केली होती.

हे म्हणने खरे नाही की, त्याच दिवशी पोलीसांनी माझ्या समक्ष एक आडजातीची लाकडी झिल्पी ज्याला दोन खडे होते ती आरोपीकडून जप्त केली होती. हे म्हणने खरे नाही की, पोलीसांनी माण्या समक्ष आरोपीकडून एक ग्रे रंगाचा रेघाटी फुलपॅन्ट, व पांढ–या रंगाचे कपडे जपत केले होते. हे म्हणने खरे नाही की, पोलीसांनी हे दोनही पंचनामे माझ्या समक्ष तयार केले व त्यानंतर मी त्यावर सही केली होती. हे म्हणने खरे नाही

की, आरोपी माझ्या ओळखीचा असल्यामुळे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपी तर्फे ॲड. श्री. एन.ए. बेलसरे.**
**नाकारले.**

**फेरतपासणी ---- काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती** **समक्ष**

**(एम.व्ही. चव्हाण)**
**न्यायदंडाधिकारी, प्र.श्रे., काटोल.**
**दि.०८/०३/२०२१.**

**(एम.व्ही. चव्हाण)**
**न्यायदंडाधिकारी, प्र.श्रे.**
**काटोल.**

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are word to word, as per original evidence.

Name of Stenographer : A.P. Dharmik